**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र
नंदुरबार

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 16-09-2025**

**नंदुरबार(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-09-16 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-09-17 | 2025-09-18 | 2025-09-19 | 2025-09-20 | 2025-09-21 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 5.0 | 10.0 | 8.0 | 3.0 | 3.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.0 | 28.0 | 29.0 | 31.0 | 31.0 |
| किमान तापमान (अं.से) | 24.0 | 24.0 | 23.0 | 22.0 | 21.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 92 | 92 | 92 | 92 | 92 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 63 | 61 | 64 | 68 | 68 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 9 | 9 | 9 | 9 | 10 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 258 | 253 | 256 | 259 | 256 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 7 | 7 | 7 | 7 |
| चेतावणी | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

## भविष्यवाणी सारांश:

भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवस तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २८ ते ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ ते २४ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. दि. २१ ते २७ सप्टेंबर २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडण्याची शक्यता आहे तसेच कमाल व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी गडगडाटी वादळे आणि विजा, वादळासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कमकुवत झाडे कोसळणे. जोरदार वारा वृक्षारोपण, बागायती आणि उभ्या पिकांचे नुकसान करू शकतो.

## कृषि सल्ला:

| |
|---|
| हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी मेघदुत मोबाईल अॅपचा आणि वीज पडण्याची पूर्वसूचना मिळवण्यासाठी दामिनी मोबाईल अॅपचा वापर करावा. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागतीची कामे लवकर करून घ्यावीत. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | कापूस पिकात पावसामुळे होणारी पात्या, फुले यांची गळ कमी करण्यासाठी नॅफ्थॅलिन अॅसेटिक अॅसीड (प्लॅनोफिक्स) या संजीवकाची हेक्टरी १०० मि.लि. ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून पात्या लागल्या असतील तेव्हा हवामान कोरडे असताना पहिली फवारणी करावी. दुसरी फवारणी त्यानंतर १५ ते २० दिवसांनी करावी. |
| मुग | पावसाची शक्यता असल्याने पक्वता अवस्थेत असलेल्या पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| मका | आंतरमशागतीची कामे करून चार ओळीनंतर एका ओळीत १० ते २० सें.मी. खोलीचा उथळ चर वा सरी काढावी. ज्यामुळे अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल. पाऊस झाल्यास पावसाचे पडणारे पाणी मुरवता येईलव मातीतील ओलावा टिकून राहील. |
| सोयाबीन | आंतरमशागतीची कामे करून चार ओळीनंतर एका ओळीत १० ते २० सें.मी. खोलीचा उथळ चर वा सरी काढावी. ज्यामुळे अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल. पाऊस झाल्यास पावसाचे पडणारे पाणी मुरवता येईलव मातीतील ओलावा टिकून राहील. |
| तूर | पावसामुळे पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.किडीचे प्रमाण जास्त असल्यास क्विनॉलफॉस (२५ ईसी) १.६ मि.लि. प्रति लिटर पाणी याप्रमाणे हवामान कोरडे असताना फवारावे. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| पपई | पावसामुळे पपईवर विषाणुजन्य रिंग स्पॉट किंवा मोझॅक किंवा केवडा रोगांचा तसेच मावा किडीचा प्रादुर्भाव दिसुन येताच १५ दिवसांच्या अंतराने १० मि. लि. डायमिथोएट किंवा १० मि.लि. निमार्क प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| कांदा | रांगडा कांदा लागवडीसाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन-२-४-१ इत्यादी सुधारीत वाणांची निवड करावी. लागवडीची वेळ: सप्टेंबर – ऑक्टोबर बियाण्याचे प्रमाण: ८ ते १० किलो प्रति हेक्टर |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | लंपी स्कीन डिसीज उपाययोजना: निरोगी जनावरांना या आजाराचा संसर्ग होऊ नये म्हणून बाधित जनावरे वेगळी बांधावीत. डास, माश्या, गोचीड इत्यादींचे प्रमाण कमी करण्यासाठी आजारी नसलेल्या जनावरांवर तसेच गोठ्यात आवश्यक औषधांची फवारणी करावी. गोठा स्वच्छ ठेवावा. गोठ्यात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बाधित भागातील जनावरे व मानवाचा निरोगी भागात प्रवेश टाळावा. आजाराची लक्षणे जनावरात आढळल्यास पशुपालकांनी त्वरित जवळच्या शासकीय दवाखान्यात कळवून तज्ञांमार्फत योग्य उपचार करून घ्यावे. |

### हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| एकाकी ठिकाणी ढगांवरून वीज कोसळण्याची शक्यता. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कमकुवत झाडे किंवा कमकुवत इमारती कोसळणे. स्थानिक आणि अल्पकालीन वीजपुरवठा खंडित होणे. कच्च्या घरांना/भिंतींना आणि झोपड्यांना किरकोळ नुकसान. |

### परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| वादळ येत असताना मोकळ्या जागेत आणि शेतात काम करणे टाळा. वादळ येत असताना उंच झाडे आणि इमारतींखाली आश्रय घेणे टाळा. विद्युत/इलेक्ट्रॉनिक उपकरणे अनप्लग करा. पाण्याच्या स्रोतांमधून ताबडतोब बाहेर पडा. वीज वाहक असलेल्या सर्व वस्तूंपासून दूर रहा. |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**